# Akshardhara Research Journal

## March-April 2025

## VOL -01 ISSUE-V

Akshara Publication
Plot. 42 Akshara Publication Gokuldham Residency
Prerna Nagar Wanjola Road Bhusawal Dist.Jalgaon [M. S.] India 425201

# Akshardhara Research Journal

Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal

**E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V**



## -: Chief Editor:–

**Dr Priyanka J. Mahajan**

Co-1110/6 Mamaji Talkies area Juna Satara Bhusawal,
Dist. Jalgaom (M.S) India Pincode 425201
Website: https://admrj.com
E-mail : admrj0404@gmail.com

## -: Executive Editor & Publisher :–

**Dr. Girish S. Koli**

42 Akshara Publication Gokuldham Prerananagar Wanjola
Road Near Star Lone Bhusawal Dist. Jalgaon
[M. S.] India 425201
**Mobile No: 9421682612**

## Member Of Editorial Board

**DR. E.G. WAJIRA GUNASENA**
Designation : Senior Lecturer (I) In Hindi
Address : Department of Languages, Cultural Studies and Performing Arts University of Sri Jayawardenepura, Nugegoda, 10250, Sri Lanka
Mobile : 0094 112758315
Email Id : wajiragunasena@sjp.ac.lk

**DR. VIVEK MANI TRIPATHI**
Designation : Assistant Professor
Address : Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China.
Mobile : 86-18666279640
Email Id : 2294414833@qq.com

**Dr. Girish Kumar Painoli**
Designation : Professor
Address : School of Commerce and Management, Aurora Deemed to be University, Hyderabad India Pin Code:500098
Mobile : 07674938785
Email Id : girishkumar@aurora.edu.in

**Dr.VIVEK ARUN JOSHI**
Designation: Assistan Professor
Address: TES's Institute of Management and Career Development, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425201
Mobile: +91 9881716287
Email Id : admin@ssgbhindimv.com


**ADRJ Disclaimer :**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of ADRJ editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.*

**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V**

05

# अध्ययन अध्यापन प्रक्रिया

**वैशाली सतीषलाल गुजराथी**
संशोधक
M.A. Education - II Year

**प्रा.डॉ.सुनिता नेमाडे**
मार्गदर्शक

---

**प्रस्तावना-**

भारतासारख्या विशाल देशांमध्ये ज्ञानार्जन आणि ज्ञानदान या प्रक्रियांना खूप महत्त्व आहे. आदिअनादि काळापासूनच गुरुकुल पद्धती तसेच मौखिक पद्धतीद्वारे ज्ञानाचे आदान प्रदान केले जायचे. शिष्यांना गुरुच्या घरी राहून मौखिक स्वरूपात ज्ञान प्राप्त करावे लागायचे. त्यावेळी लेखन कला किंवा लिपी अस्तित्वात नव्हती. पुढील काळात लिपी म्हणजेच भाषेचे लिखित स्वरूप वापरणे सुरू झाले. आणि त्यातूनच ज्ञान हे लिखित स्वरूपात पुस्तकात व ग्रंथात संग्रहित करण्यात आले. त्यावेळी देखील अध्ययन अध्यापन प्रक्रिया या शास्त्रीय पद्धतीने केल्या जात असत. परंतु आजच्या काळात अध्ययन अध्यापन प्रक्रिया या खूप सूक्ष्मस्तरापासून तर विशालस्तरापर्यंत बारकाईने अभ्यासपूर्वक व मानसशास्त्राच्या दृष्टीने विकसित होताना दिसत आहेत. अलीकडच्या काळात अनेक शिक्षण तज्ज्ञांनी लेखकांनी शिक्षण शास्त्र हे विकसित केले त्यामध्ये अध्यापनाची सूत्रे, अध्यापनाच्या पद्धती, मूल्यमापन, उपचारात्मक अध्यापन व बुद्ध्यांक या सर्व गोष्टींचे विविध प्रयोगांच्या माध्यमातून पृथक्करण केले. अनेक शिक्षण तज्ज्ञांनी मते-मतांतरे मांडली. अध्ययनकर्त्यांवर प्रयोग करण्यात आले आणि त्यातून नवनवीन संकल्पना शिक्षण शास्त्रामध्ये मांडण्यात आल्या. त्यावर पुन्हा संशोधन करण्यात आले. आणि हे संशोधन आणि त्याची अंमलबजावणी अद्याप देखील अखंडितपणे सुरू आहे. प्रत्येक पद्धतीची परिणामकारकता तपासली जाऊन या संदर्भात विविध संकल्पना आणि त्या संकल्पनांची यशस्विता पडताळून पाहिली जात आहे. अध्ययनकर्त्यावर विविध पद्धतीचे प्रयोग केले जातात. आणि त्या प्रयोगाच्या निष्कर्षांवरून एखाद्या पद्धतीची परिणामकारकता आणि प्रभावीपणा या संदर्भात निष्कर्ष काढले जातात. आणि त्या निष्कर्षांचे सामान्यीकरण करून प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या व्यवसायिक कारकिर्दीत अध्यायावत पद्धतींचे प्रशिक्षण दिले जाते. अशा पद्धतीने अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये सततचा अद्ययावतपणा हा शिक्षण शास्त्राला अधिक समृद्ध करत आहे.

अध्ययन व अध्यापन या परस्परपुरक अशा क्रिया आहेत. सोप्या शब्दात अध्ययन म्हणजे शिकणे व अध्यापन म्हणजे शिकविणे होय. पण अध्यापन ही संकल्पना व्यापक आहे. अध्यापनात विद्यार्थ्यांना एखादी कृती कशी करावी हे दर्शवून त्याप्रमाणे कृती करण्यास प्रोत्साहित केले जाते. विशिष्ट कृती, उपक्रम, पाठघटक, अनुभव पद्धतीद्वारे मुलांना ज्ञानप्राप्ती करण्यासाठी अध्ययन पूरक वातावरण तयार केले जाते. विदयार्थ्याच्या वर्तनामध्ये सकारात्मक व अपेक्षित परिवर्तन आणण्यासाठी अध्ययन अनुभव दिले जातात. स्त्रोतव्यक्तीकडून अध्ययनकर्त्यास ज्ञान, कौशल्य व अभिरूची प्राप्त करण्यासाठी मदत केली जाते. विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक अनुभव देऊन एखाद्या विषयासंबंधी आवड व जिज्ञासा निर्माण करुन अधिक ज्ञानप्राप्तीसाठी प्रोत्साहित करण्यात येते.

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील महत्त्वाच्या गोष्टी**

अध्यापन ही द्विकेंद्री प्रक्रिया असून या प्रक्रियेचे अध्ययनकर्ता व अध्यापक हे दोन केंद्र असतात. अध्यापनात उद्दिष्टे साध्य झाली तर अध्यापन यशस्वी होते. अदद्ययावत माहितीचे आदानप्रदान केले जाते. विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व अधिक समृद्ध करणे व त्यांच्यात नवीन कौशल्यांचा विकास होत असतो. विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित व सकारात्मक बदल घडत असतात. विदयार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून होत असतो. विद्यार्थी स्व-अध्ययनास प्रेरित असे अध्ययनास पोषक वातावरण अध्यापकास निर्माण करावे लागते . विदयार्थ्यांमध्ये निर्णयक्षमतेचा विकास होण्यासाठी विशिष्ट अध्ययन अनुभवांची संरचना केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशिलता विकसित होण्यासाठी त्यांना अध्यापक अध्ययन पूरक कृती व नवोपक्रम करण्यासंदर्भात मार्गदर्शन देतात. विद्यार्थ्यांच्या आंतरिक मनोरचना व बाह्य अनुभव यामध्ये सुसंवाद साधला जावा अशा पद्धतीने अध्ययन अनुभवांची रचना अध्यापक करतात.

**शिक्षण म्हणजे काय?**

अध्यापक विविध अध्ययन अनुभवांच्या माध्यमातून अध्ययनकर्त्याच्या वर्तनात सतत विकासात्मक बदल होत असतो. हा बदल, विकास म्हणजे शिक्षण होय. अध्ययनकर्त्याच्या 'व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास' हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. शिक्षण प्रक्रिया ही आयुष्यभर, सातत्याने चालणारी, अखंड प्रक्रिया आहे. शिक्षणाची काही प्रमुख मुख्य उद्देश

**१. ज्ञानार्जन २. चारित्र्याचा विकास ३. आरोग्य संवर्धन ४. उपजीविका साधन ५. व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास ६. देशाचे सुसंस्कृत नागरिक घडवणे**

प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण हे औपचारिक शिक्षणातील प्रमुख टप्पे आहेत.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

**भारतीय शैक्षणिक पार्श्वभूमी**

१९११ साली केंद्रीय कायदेमंडळात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक गोपाळ कृष्ण गोखले यांनी मांडले. १९६४-६६ साली शिक्षण आयोगाने महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांच्या पार्श्वभूमीवर आणि बदलत्या सामाजिक-राजकीय संदर्भात राष्ट्रीय एकात्मते विषयी डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली विचारविनिमय करण्यात आला. १९६८ साली भारताचे पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणानुसार देशभरात शालेय शिक्षणाची समान स्तररचना करण्यात आली. १९७६ साली राज्यघटनेत बदल करण्यात आला की शिक्षण हा फक्त केंद्र सरकारचा विषय न राहता, त्याचा केंद्र व राज्य या दोन्हीही सरकारांच्या सूचीत समावेश करण्यात आला.

भारत देशासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ साली जाहीर करण्यात आले. शिक्षणातील गुणवत्ता, लवचिकता आणि समर्पकता या बाबींना या धोरणात प्राधान्य देण्यात आले. पुढे याच राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरणाती तरतुदी कायम ठेवून २००५ मध्ये सुधारित राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा जाहीर करण्यात आला.

बालकांच्या शिक्षणाच्या हक्काच्या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातही प्रथमच इयत्ता पहिली ते बारावीसाठी सलग अभ्यासक्रम आराखडा (२०१०) तयार करण्यात आला.

**अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील महत्त्वाची वैशिष्ट्ये**

१) विविध भाषांमधून अध्ययन अध्यापन

अध्ययन अध्यापन प्रक्रिया ही प्रामुख्याने अध्ययनकर्त्याच्या मातृभाषेतून अधिक प्रभावीरीत्या होते असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यासाठी अध्ययनकर्त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या संस्थांची उभारणी केली जात आहे. त्यामध्ये मराठी माध्यमाच्या शाळा सर्वाधिक संख्येने आहे. तसेच उर्दू, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, तेलुगु, कन्नड, सिंधी या इतर भाषांमधून देखील अध्ययन अध्यापनाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते.

२) अध्यापकांचे प्रशिक्षण :

शिक्षण प्रक्रियेतील नवनवीन संकल्पना अध्ययन सुलभ पद्धती व तंत्र अध्यापकास प्राप्त व्हावी आणि त्यातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी यासाठी वेळोवेळी अध्यापकाचे प्रशिक्षण होत असते त्या प्रशिक्षणातून अध्यापकाला अध्ययन कर्त्या सुलभ होईल अशा पद्धतीची नवनवीन साधने व तंत्र यांचे ज्ञान दिले जाते. अध्ययनकर्त्याच्या वेगवेगळ्या गरजा लक्षात घेतल्या, की विशेषतः प्राथमिक स्तरावर त्यांना अतिरिक्त पूरक मदत देणे, शिकण्यासाठी पुरेसा अवधी देणे, मोकळीक देणे या गोष्टी आवर्जून केल्या पाहिजेत. शिक्षण व्यवस्थेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी खास तरतुदी करण्यात आल्या आहेत. सामाजिक, आर्थिक त्याचप्रमाणे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या ज्या विद्यार्थ्यांच्या विशेष गरजा आहेत, म्हणजेच ज्यांच्या शिक्षणासाठी शाळेतील नियमित अध्यापना व्यतिरिक्त आणखी काही सोयी-सुविधा, मदत, मार्गदर्शनाची गरज आहे, ते त्यांना अध्ययन सुलभ होण्यासाठी अध्यापन करताना विविध साधनांचा सोयींचा उपयोग करावा व त्यांच्या शारीरिक मानसिक मर्यादा लक्षात घेऊन त्यांना अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करावे.

३) मूल्यशिक्षण :

भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय, धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्यांचे शिक्षण अध्ययनकर्त्यास दिले जावे त्यासाठी योग्य ते अध्ययन अनुभव अद्यापकाने निर्माण करावे व त्यास पोषक वातावरण देखील अध्ययन अध्यापन प्रक्रियेत महत्त्वाचे ठरते. राष्ट्रीय संदर्भात आणि लोकशाही व्यवस्थेतील जबाबदार नागरिक घडवण्यासाठी संविधानातील मूल्यांची रुजवणूक करत असताना मानवी हक्कांचे शिक्षण देणेही आवश्यक आहे.

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेत जीवन-कौशल्यांचे महत्त्व**-अध्ययनकर्त्यास जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे, यासाठी अध्ययनकर्त्याची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे 'जीवन-कौशल्ये शिक्षण' होय. जागतिक आरोग्य संघटनेने दहा जीवन कौशल्ये नमुद केली आहेत.

1. स्वजागृती (Self-awareness): स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आवडीनिवडी, इच्छा आकांक्षा ओळखण्याचे कौशल्य म्हणजे स्वजागृती होय.
2. समानानुभूती (Empathy) दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून या जागी आपण असतो तर काय झाले असते असा विचार करण्याचे कौशल्य म्हणजे समानानुभूती
3. समस्या निराकरण (Problem solving) उपलब्ध पर्यायांतून योग्य व अचूक पर्याय निवडून समस्येचे समाधान शोधण्याचे कौशल्य म्हणजे समस्या निराकरण होय.
4. निर्णयक्षमता (Decision making): समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत अनेक पर्याय शोधून त्यांतील योग्य व अचूक पर्याय निवडण्याचे कौशल्य म्हणजे निर्णय क्षमता होय.

5. प्रभावी संप्रेषण (Effective communication): आपले विचार शाब्दिक किंवा अशाब्दिक माध्यमातून प्रभावीपणे मांडून समोरच्यापर्यंत अचूक पद्धतीने पोहोचवण्याचे कौशल्य म्हणजे संप्रेषण कौशल्य होय.
6. चिकित्सक विचार (Critical thinking): उपलब्ध माहितीचे विश्लेषण व परीक्षण सर्व पैलूंना अनुलक्षण तटस्थपणे करण्याचे कौशल्य म्हणजे चिकित्सक विचार प्रक्रिया होय.
7. सर्जनशील विचार (Creative thinking) पारंपरिक व पुनरावृत्तीने आढळणाऱ्या पद्धतीपेक्षा वेगळया व नवीन पद्धतीने एखाद्या समस्येबद्दल किंवा परिस्थितीबद्दल विचार करण्याचे कौशल्य म्हणजे सर्जनशील विचार होय.
8. आंतरव्यक्ती संबंध (Interpersonal relations): दैनंदिन जीवनात सतत संपर्कात असलेल्यांबरोबरचे संबंध ओळखून निर्भय व स्नेहपूर्ण संबंध राखण्याचे कौशल्य होय.
9. भावनांचे समायोजन (Coping with emotions): आपल्या व इतरांच्या भावना, तसेच त्यांचे परिणाम समजून घेण्याचे ओळखून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य होय.
10. ताणतणावांचे समायोजन (Coping with stress): ताणतणावांची कारणे शोधून त्यांचे होणारे शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य होय.

ही कौशल्ये आत्मसात व विकसित करण्यासाठी अध्यापकाने अध्ययन अनुभवांची रचना आणि उपयोजन करणे महत्त्वाचे आहे. सराव करण्याची भरपूर संधी मिळाली पाहिजे.

**अध्यापकाने अध्ययन करताना पुढील गोष्टींची काळजी घेणे महत्त्वाचे आहे**

१) **अध्ययनकर्त्यास तणाव विरहित अध्यापन करणे:** अध्ययनकर्त्यास सर्व माहिती शिकण्याची सक्ती करण्यापेक्षा मूलभूत ज्ञान देणे व त्यापुढील माहिती स्वतः मिळवण्याची तंत्रे, कौशल्ये शिकवणे गरजेचे आहे. या स्वरूपात अभ्यासविषयांची फेरमांडणी केल्यास विद्यार्थ्यांच्या मनावरील माहितीचे ओझे आणि निरूपयोगी घोकंपट्टीचा ताण कमी करता येईल. माहितीपेक्षा प्रत्यक्ष कृती व जीवनानुभवाला प्राधान्य दिले पाहिजे.

२) **अध्ययनकर्त्यास नेहमी ज्ञान मिळवण्यास प्रोत्साहित करणे :** राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात 'Learning to learn' या संकल्पनेवर भर देण्यात आलेला आहे. यापुढील काळात ज्ञान आणि कौशल्य या दोन्ही बाबींमध्ये सतत बदल होत राहणार आहेत आणि त्यांच्या विकासाची प्रक्रिया चालू राहणार आहे. त्यामुळे शाळेत मिळवलेल्या ज्ञान व कौशल्यांची शिदोरी ही देखील विकसनशील स्वरूपाचीच असली पाहिजे. शिकण्याच्या क्षमतांमध्ये संदर्भ कौशल्ये (Reference skills) उदाहरणार्थ, शब्दकोश, इंटरनेट इत्यादी गोष्टी हाताळता येणे, अध्ययन कौशल्य (Study skills) उदाहरणार्थ अध्ययन केलेल्या आशयाचे स्वतःच्या अध्ययनासाठी टिपण ठेवता येणे, त्यांतील मुद्यांची सोप्या पद्धतीने मांडणी, क्रम इत्यादी बाबी नीट लक्षात घेणे अध्ययनकर्त्याचे कर्तव्य आहे.

३) **अध्यापकाने आशयाची मांडणी सोप्या व सुलभ पद्धतीने करणे :** स्थानिक स्तरावरील ऐतिहासिक, भौगोलिक वैशिष्ट्ये, कला, संस्कृती, भाषेची विविधता हा भागही महत्त्वाचा असल्याने तो आशयात चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. आशयातील सर्वसमावेशक भागात सर्व मूलभूत संकल्पनांचा व कौशल्यांचा समावेश राहील, तर लवचिक भागातही अपेक्षित अध्ययन प्रक्रिया व मूल्यमापन योजना राज्यभरासाठी समान राहील.

४) **अध्ययनकर्त्याला प्रोत्साहन देणे व मूल्यांकन करणे :** नव्याने तयार होणारा माहितीचा संग्रह व आशय दर्जेदार, उपयुक्त आणि आत्मसात करण्यास सोपा असावा.

**अध्ययन अनुभवांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण बाबी**

1) **अध्ययनकर्त्यांच्या अनुभव विश्वाशी समन्वय:** अध्ययन अध्यापनाचे उद्दिष्ट निश्चित करत असताना अध्ययनकर्त्यांच्या व समाजाच्या भविष्याचा विचार होतो, त्याचवेळी विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाचाही विचार होणे महत्त्वपूर्ण असते. विद्यार्थ्यांच्या बालवयानुरूप, किशोरवयानुरुप त्यांच्या भावनिक, सामाजिक गरजा असतात आणि त्यांचा अध्ययनावर सतत व मोठ्या प्रमाणावर परिणाम होत राहतो. अध्ययनकर्त्यांच्या या भावनिक, सामाजिक गरजांची वयानुरूप पूर्तता होईल अशा प्रकारे आशय व अध्ययन अनुभवांची निश्चिती करणे आवश्यक आहे.
2) **अध्ययनकर्त्यांच्या भावी काळाशी समन्वय:** लोकशाही व्यवस्थेतील जबाबदार नागरिक म्हणून वावरण्यासाठी आवश्यक ती तयारी शिक्षणातून झाली पाहिजे, तसेच अध्ययनकर्त्यांच्या व्यक्तिगत, बौद्धिक, भावनिक व शारीरिक जडणघडणीसाठी आवश्यक ते अध्ययन अनुभव त्याला शिक्षणातून मिळाले पाहिजेत.
3) **अध्ययन अनुभवांचा कार्यजगताशी समन्वय:** अध्ययनकर्त्याला कार्यजगतात आपले योगदान देण्यासाठी चांगल्या पद्धतीच्या अध्ययन अनुभव देण्याची गरज असते. अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याने कार्यजगतात आवश्यक असणारे

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

ज्ञान व कौशल्ये आणि वृत्ती अध्ययनकर त्याला अध्ययन अनुभवातून मिळाली पाहिजे. अध्ययन अनुभवातून मिळणारे ज्ञान, कौशल्ये, क्षमता या कार्यजगताला पूरक, समाधानकारक असावी अशी काळजी अध्यापकाने घ्यावी.

4) **अध्ययन अनुभव देताना ज्ञानरचनावादी पद्धतीचा वापर:** ज्ञानरचनावादी संकल्पना या प्रत्यक्ष व्यवहारातील मानवी अध्ययनाचा अभ्यास करून मांडलेल्या असल्यामुळे अधिक उपयुक्त आणि वास्तवाच्या जवळ जाणाऱ्या आहेत. परंतु त्या राबवण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे स्वरूप आमूलाग्र बदलण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सजग, संवेदनशील, सक्रिय व सक्षम अध्यापकाची आवश्यकता आहे. ज्ञानरचनावाद संपूर्ण राज्यातील वर्गखोल्यांमध्ये प्रत्यक्षात यायचा असेल, तर अध्ययन अनुभव आणि मूल्यमापन पद्धतीतही मोठे बदल करावे लागतील.

5) **पूरक अशा अध्ययन अनुभवांची निर्मिती:** अध्ययनकर्त्याच्या स्वतःच्या अध्ययनाला चालना व दिशा देण्यासाठी निरीक्षण, प्रयोग, प्रकल्प, कृतियुक्त अध्ययन, स्वयं-अध्ययन या तंत्राना महत्त्व देऊन विषयाची मांडणी संपूर्णपणे नव्याने अध्यापकाला करावी लागेल. क्रमिक पुस्तकांबरोबरच स्वयं-अध्ययन पुस्तिका, अध्ययन कार्ड, तक्ते, नकाशे, पुरक साहित्य असे संच तयार करावे लागतील. त्याचबरोबर अध्ययनकर्त्याचे अपेक्षित अध्ययन घडून येण्यासाठी या विविध बाबींचा नेमका कसा वापर करावा हे स्पष्ट करणारे मार्गदर्शक साहित्य अध्यापकांसाठीही तयार करावे लागेल.

6) **आशयासोबत अध्ययन प्रक्रियेचे मूल्यमापन:** नवीन अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये 'अध्यापकाने अध्ययन करताना काय दिले' यापेक्षा अध्ययनकर्त्याच्या मनात कोणती ज्ञाननिर्मिती झाली, कोणती कौशल्ये त्यांनी किती प्रमाणात साध्य केली, व त्यामध्ये सुधारणा, बदल करण्याची क्षमता त्यांच्यात किती प्रमाणात निर्माण झाली याला महत्त्व असल्यामुळे मूल्यमापनातही आशयावर भर असेल आणि त्यासोबतच अध्ययन पद्धतीचे आणि अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे मूल्यमापन होणे महत्त्वपूर्ण ठरेल. समस्यांची उकल, मुक्तोत्तरी (Open Ended), बहुत्तरी प्रश्न, क्षमता विकासाची चाचणी या बाबी महत्त्वाच्या ठरतील. मूल्ययमापनाचे फलितही अध्ययनकर्त्याची वर्गवारी, क्रमवारी ठरवण्यासाठी नाही, तर मुख्यतः विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला दिशा देण्यासाठी वापरले जाईल.

7) **सर्वसमावेशक अशा अध्ययन अनुभवांची पुनर्मांडणी:** सर्वांचा विचार करून बहुआयामी परंतु लवचिक अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम हा एक सर्वंकष दस्तऐवज असावा.

8) **कालसापेक्ष आणि सर्वोपयोगी आशयाची निर्मिती:** कोडी, समस्यापूर्वी, उखाणे इत्यादीतून विचारांना चालना आणि रंजन या दोन्ही बाबी साध्य होतात, कविता, श्लोक, सुवचने, पाढे अशा बाबी मुलांना पाठांतरातून सहज कायमस्वरूपी उपलब्ध राहतात. त्या व्यवहारात घेट उपयोगी पडतात आणि मार्गदर्शकही ठरतात. मुखोद्गत ज्ञान हे सुशिक्षित, समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे एक निदर्शक मानले जाते.

9) **भारत देशाची विविधता लक्षात घेऊन अध्ययन अनुभवांची विश्वसनीयता आणि यथार्थता:** शालेय स्तरावरील अनेक अभ्यासक्रमांची व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करताना वापरण्यात येणारे संदर्भग्रंथ अनेकदा पाश्चिमात्य असतात. त्यामुळे त्या विषयांची मांडणी युरोपियन, ब्रिटिश किंवा अमेरिकन संदर्भात केलेली असते. त्यावरून भारतीय अध्ययनकर्त्यांना भारतीय ज्ञानविषयक परंपराचे यथार्थ दर्शन होत नाही, भारतीय ज्ञान व परंपरा अध्ययनकर्त्यापर्यंत पोहोचवण्याची महत्त्वपूर्ण काम अध्यापक आणि करावे.

10) **अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे (भाषा) माध्यम:** मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करता अध्ययनकर्त्याला शक्यतो त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण मिळावे म्हणजे त्याच्या मूलभूत संकल्पना तसेच आवर्त संकल्पना चांगल्या पद्धतीने स्पष्ट होतात. तरी आधुनिक काळातील भाषिक वास्तव बरेच गुंतागुंतीचे असल्यामुळे ही बाब पूर्णपणे प्रत्यक्षात येत नाही. महाराष्ट्रात राहणाऱ्या अध्ययनकर्त्यास इंग्रजी, मराठी आणि हिंदी या भाषा अनिवार्य म्हणून शिकाव्या लागतात. त्यापेक्षा त्यांची मातृभाषा निराळी असल्यास अभ्यासक्रमातील भाषिक भागाची व्याप्ती त्यांच्या दृष्टीने बरीच वाढते. या पार्श्वभूमीवर अगदी प्राथमिक स्तरापासूनच भाषाविषयक योजना लवचिकता व अध्ययनकर्त्याच्या घरातील भाषेला शिक्षण व्यवहारात मानाचे व आपुलकीचे स्थान देणारी असणे अत्यावश्यक आहे.

11) **अध्ययन अध्यापन प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर:** अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अध्यापन कर्त्यासाठी सीडी, डीव्हीडी, पेन ड्राईव्ह व इंटरनेटवरून अध्ययनसाहित्य तसेच अध्ययनपूरक साहित्य उपलब्ध करून देणे, अध्ययनकर्त्यासाठी स्वयंअध्ययन साहित्य, शैक्षणिक साहित्य स्वयं अध्ययन साहित्य इत्यादी उपलब्ध करून देणे हे अध्यापकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांना कधीही गरज वाटेल तेव्हा अध्ययन करता स्वतःच्या अळी अडचणी सोडवण्यासाठी तसेच शंका दूर करण्यासाठी, एखादी अवघड गोष्ट कृती समजून घेण्यासाठी अध्यापकांमार्फत ऑनलाइन प्रश्नोत्तर सेवा उपलब्ध करून देणे, अध्यापकांसाठी ऑनलाईन मार्गदर्शन देणाऱ्या साईट्स सुरू करणे.

*Akshardhara Research Journal*
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V**

12) **अध्ययनकर्त्यांच्या वयोगटा नुसार अध्ययन अनुभव देणे:** अध्यापकाने अध्ययनकर्त्यांच्या वयोगटानुसार अध्ययन अनुभवांची रचना करावी. जरी एकाच वयोगटातील अनेक अध्ययनकर्ते आपल्यासमोर असतील तरी प्रत्येकाची वैचारिक पातळी, पूर्वज्ञान, पूर्वानुभव, भावविश्व, बौद्धिक आणि मानसिक क्षमता या वेगळ्या असतात. या सर्व गोष्टींना लक्षात घेऊन अध्यापकाने सर्वसमावेशक, सर्वांना पेलवेल, रुचेल, समजेल अशा पद्धतीचे अध्ययन अनुभव तयार करावे. आणि त्यांची विश्वसनीयता तपासून त्यांची प्रभावी आणि परिणामकारक अंमलबजावणीसाठी एकाच वयोगटाचे अध्ययनकर्ते असतील तरी देखील त्यामध्ये अजून उपगट तयार करून अध्ययनकर्त्यास आशय समजेपर्यंत अध्ययन अनुभव द्यावे. वेळोवेळी अध्ययन अनुभवांमध्ये बदल करावे. म्हणजेच अध्ययन अध्यापन प्रक्रिया यशस्वी झाली असे म्हणता येईल.
13) **अध्ययन अनुभवातील प्रयोगशीलता** : शिक्षण क्षेत्रातील अपेक्षित असणाऱ्या आमूलाग्र बदलांना चालना व चांगली दिशा देण्यासाठी अध्ययन अनुभवांच्या प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. अध्यापकाने आपल्या दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये सतत बदल करणे महत्त्वाचे आहे.

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे मूल्यमापन-** अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये मूल्यमापनाला खूप महत्त्व आहे. मूल्यमापनाची अनेक साधने व तंत्रे आहेत. त्यापैकी योग्य त्या साधनांची व तंत्रांची निवड करून अध्यापकाला अध्ययनकर्त्याचे मूल्यमापन करावे लागते. ज्या पद्धतीद्वारे अध्ययनकर्त्याचे मूल्यमापन केले जाणार आहे. त्या पद्धतीबद्दल अध्यापकाने अध्ययनकर्त्यांना पूर्वकल्पना देणे महत्त्वाचे आहे.

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला मूल्यमापन पद्धतीबद्दल माहिती दिल्यास अध्ययनकर्त्यास अध्यापन करताना कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावे याची स्पष्टता आधीच मिळालेली असते. त्यामुळे आपण मूल्यमापनाच्या कसोट्यांवर पूर्ण उतरण्यासाठी अध्ययनकर्ते प्रयत्न करतात. शैक्षणिक उद्दिष्टपूर्तीकडे वाटचालकरतात. उदा. गणितीय कोड्यांना मूल्यमापनात स्थान दिले जाणार आहे हे अध्ययनकर्त्यांना सुरुवातीला सांगितल्यास अधिकाधिक अध्ययनकर्ते गणितीय कोडे सोडवण्याचा प्रयत्न करतील. त्याचप्रमाणे सादरीकरणाला मूल्यमापनात महत्त्व दिले जाणार असल्याचे सुरुवातीला सांगितल्यास अध्ययन करते प्रत्येक विषयावर आपले मत मांडण्याचा प्रयत्न करतील.

**मूल्यमापन साधने व तंत्रे-**अध्यापकाने अध्ययनकर्त्याला काय अध्यापन केले, काय मार्गदर्शन केले, त्याचा अध्ययनकर्त्यांना किती फायदा झाला, अध्ययनकर्त्यांनी त्यापैकी किती ज्ञान आत्मसात केले, अभ्यासक्रमाची जी उद्दिष्टे आहेत ती पूर्ण होत आहेत काय, उद्दिष्टांच्या दिशेने आपली वाटचाल होत आहे का, याचा पडताळा घेणे म्हणजेच मूल्यमापन होय.

शैक्षणिक प्रक्रियेमध्ये अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन या तिन्ही संकल्पना एकमेकांशी खूप जवळून संबंधित आहेत. मूल्यमापनाशिवाय अध्यापन पूर्ण होऊ शकत नाही. मूल्यमापनामुळे अध्ययनकर्त्याची प्रगती कितपत झाली, उद्दिष्टपूर्ती झाली का हे कळून येते. अध्यापनातील त्रुटी टाळून अध्यापन अधिक प्रभावी व निर्दोष करता येते. अध्ययनकर्त्याचा सर्वंकष विकास हे शिक्षणाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. सर्वंकष विकास म्हणजे बोधात्मक, भावनात्मक व कृतियुक्त विकास होय. या तिन्ही प्रकारचा अध्ययनकर्त्यांचा विकास घडून येणे म्हणजे त्यांचा सर्वंकष विकास होय.

**समारोप-** अध्ययन अध्यापन प्रक्रिया ही एक शास्त्रीय प्रक्रिया आहे. अध्यापकाने अध्ययनकर्त्याला विविध अध्ययन अनुभव देणे म्हणजेच अध्ययन अध्यापन होय. अध्ययनकर्त्याला त्याच्या भावी आयुष्यात अध्ययन अनुभव उपयुक्त ठरावे व तो एक चांगला नागरिक म्हणून ओळखला जावा. यासाठी योग्य त्या आशयाची आणि आशयाला अनुसरून समर्पक अशा अध्ययन अनुभवांची रचना करणे ही अध्यापकाचे कर्तव्य असते. अध्ययनकर्त्यांमधील सुप्त गुणांना आणि कौशल्यांना पूरक अशा अध्ययन अनुभवांची रचना ही अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या यशस्वी मध्ये महत्त्वपूर्ण असते. अध्ययन अध्यापन प्रक्रियेची यशस्विता पडताळून पाहण्यासाठी अध्ययनकर्त्यांचे बहुआयामी आणि सर्वंकष मूल्यमापन होणे महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. Sharma, T. R. (2018). *NAAC accreditation and assessment in higher education*. Atlantic Publishers.
2. Pathak, R. P. (2020). *Quality assurance in higher education: A handbook for NAAC accreditation*. Pearson Education.
3. Pal, S. K. (2017). *Teaching and learning strategies in higher education*. Sage Publications.
4. Kumar, A. (2019). *Educational innovations and NAAC: Transforming teaching practices*. Wiley India.
5. Verma, S. (2021). *Accreditation framework for colleges and universities: A NAAC perspective*. McGraw Hill Education.

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 